# प्रेस नोट दिनांक २१/०९/२०१८

दिनांक २३/०९/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता पुणे शहरातील सार्वजनिक गणपतींचे विसर्जन होणार आहे. गणेश विसर्जन मिरवणुका लक्ष्मी रोड, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता, कर्वे रस्ता, लष्कर, खडकी, दत्तवाडी, मुख्यतः खालील मार्गांनी/भागातून जाणार आहेत.

१) मुख्य मिरवणुक मार्ग सेक्टरमध्ये विभागण्यात आले असुन, प्रत्येक सेक्टर करीता पोलीस उप आयुक्त तसेच सहा.पोलीस आयुक्त दर्जाचे अधिकारी, इनचार्ज म्हणुन देण्यात आलेले आहेत. प्रमुख विसर्जन मिरवणुका शहराच्या मध्यवर्ती भागातून निघणार असुन, सदर भागात विशेष बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

२) मिरवणुकीचे मार्गाचे बीडीडीएस एकुण ७ टिमच्या मदतीने घातपात विरोधी चेकींग करण्यात येत आहे. तसेच प्रमुख मार्गाला जोडणाऱ्या गल्लीबोळ, उंच इमारती, वॉच टॉवर, विसर्जन घाट, पोलीस मदत केंद्रे, स्वागत कक्ष, बॅरेकेडींग पॉइंट, ॲब्युलन्स व वैद्यकीय पथके, जिवरक्षक, फायर ब्रिगेड, इलेक्ट्रीशियन अशा प्रकारे बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

३) बंदोबस्ताकरीता मुख्य मिरवणुकीसाठी ४ अपर पोलीस आयुक्त, १३ पोलीस उप आयुक्त, २८ सहा.पोलीस आयुक्त, ८५ पोलीस निरीक्षक, २४१ सपोनि/पोउपनि, २६५० पोलीस कर्मचारी नेमण्यात आलेले असुन, संपुर्ण पुणे शहरामध्ये गणेशोत्सव मिरवणुकीकरीता ३२ सहा.पोलीस आयुक्त, १४६ पोलीस निरीक्षक, ४४८ सपोनि/पोउपनि, ७०२९ पोलीस कर्मचारी नेमलेले आहेत.

४) बाहेरील ३ पोलीस उप आयुक्त, ५ सहा.पोलीस आयुक्त, १६ पोलीस निरीक्षक, २१ सपोनि/पोउपनि, एकुण १५० कर्मचारी, एसआरपीच्या २ कंपन्या, ३५० होमगार्ड असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

५) तसेच फरासखाना नियंत्रणकक्ष व मुख्य नियंत्रणकक्ष याठिकाणी रिझर्व फोर्स, स्ट्रायकींग वाहनासह ठेवण्यात आलेला असुन, ५ जलद प्रतिसाद पथके, वज्र, लिमा, वरूण व ५ दंगल नियंत्रण पथके नियुक्त करण्यात आलेली आहेत. तसेच बेलबाग चौक याठिकाणी फिरते नियंत्रणकक्ष ठेवण्यात आलेले आहे.

६) बंदोबस्ताकरीता साध्या गणवेषात पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले असुन, वाहतुक नियंत्रणासाठी वाहतुक शाखेकडील वेगळा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. विसर्जन मिरवणुकीच्या प्रमुख मार्गावर ३९ ठिकाणी एकुण १६९ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आलेले असुन, त्याव्दारे, मिरवणुकीतील प्रत्येक हालचालीवर सी.सी.टी.व्ही. कंट्रोल रूम मधुन नजर ठेवण्यात येणार आहे.

७) नागरिकांना आवाहान करण्यात येते की, कोणीही अफावांवर विश्वास ठेवू नये. काहीही संशयीत व्यक्ती अगर वस्तु निदर्शनास आल्यास पोलीस नियंत्रणकक्ष येथे १०० क्रमांकावर संपर्क साधावा व गणेशाचे विसर्जन शांततेत पाडण्याकरीता प्रशासनास सहकार्य करावे.

Scanned by CamScanner